# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :- २/एनजीसी/नियतठेव/२०१२/९,३९
दिनांक : 6 JUL 2012

प्रति,
प्राचार्य,
श्री. सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे,
सोमेश्वर इंजिनिअरिंग कॉलेज,
गट नं. ५३, वाघळ वाडी,
पोस्ट,सोमेश्वर नगर,
ता. बारामती,
जिल्हा पुणे - ४१२ ३०६.

(Institute Code 6795)

विषय : शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून विना-अनुदान तत्त्वावर नवीन संस्था सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/२०१२/१-७१४१६७५७१, दि. १० मे, २०१२
२. शासन निर्णय क्र. टिईएम-२०१२/प्र.क्र.९८(भाग -३)/तांशि-४,दि.३० जून, २०१२

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने व शासनाने संदर्भाधिन पत्रान्वये आपणास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता | नियतठेवीची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | सिव्हिल इंजिनिअरिंग | ६० | रू.२२.५० लाख (प्रथम वर्ष) रू.२२.५० लाख (द्वितिय वर्ष) |
| २. | कॉम्प्युटर इंजिनिअरिंग | ६० | |
| ३. | इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग | ६० | |
| ३. | इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्यूनिकेशन इंजिनिअरिंग | ६० | |
| ४. | मेकॅनिकल इंजिनिअरिंग | ६० | |

सदर अभ्यासक्रमासाठी संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात नॅशनलाईज किंवा शेडयुल बँकेत प्रथम वर्षासाठी रू. २२.५० लाख व द्वितिय वर्षासाठी रू. २२.५० लाख असे एकुण रू. ४५.०० लाख नियत ठेव १० वर्षासाठी जमा करुन नियतठेवीची मूळप्रत पडताळणीसाठी या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी. (तसेच सदर एफ.डी.मध्ये नांवासमोर ("EN-N-12) हा कोड नमूद करण्यात यावा.)

C:\Users\desk2\Documents\Shailaja-1\FD letter - new instt 2012-12\New Engg Instt..doc

सदर संस्था सुरु करण्यासाठी खाली नमूद केलेल्या बाबींची पुर्तता करुन खालील कागदपत्रांच्या प्रतीसहीत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

१. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेचे पत्र, शासन मान्यतेचे पत्र, विद्यापीठाचे मान्यता पत्र इत्यादी पत्रांच्या साक्षांकित प्रती.

२. रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर करावे. (सोबत हमीपत्राच्या मसुद्याची प्रत जोडली आहे.)

३. हमीपत्राच्या मसुद्यात दर्शविण्यात आलेल्या विहीत तक्त्यात सदर संस्था सुरु करण्यास अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा-यांची माहिती समाविष्ट करण्यांत यावी.

४. तसेच हमीपत्रात दर्शविण्यात आलेल्या विहित तक्त्यात सदर अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यांत आलेली पुस्तके, संगणक, यंत्रसामुग्री तसेच फर्निचर बाबतची माहिती सादर करण्यात यावी.

५. संयुक्त खात्यात नियत ठेव ठेवण्यासाठी बँकेचा नमुना स्वाक्षरी फॅार्म संस्थाचालक ह्यांच्या स्वाक्षरी सहीत मा. संचालकांच्या स्वाक्षरी करीता सादर करावा.

सदर संस्थेसाठी पूणे विद्यापीठ, पूणे यांची संलग्नता घेणे आवश्यक आहे. विद्यापीठाची संलग्नता नसल्यास सदर पदवी अभ्यासक्रमाचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच वरील बाबींची पूर्तता करुन माहिती कागदपत्रासह सादर केल्यानंतरच अभ्यासक्रम सुरु करण्याची या संचालनालयाची अंतिम परवानगी देण्यात येईल.

(डॉ.वि.म.माहितकर)
उपसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१. मा. कुलसचिव, पूणे विद्यापीठ, पूणे यांना मानार्थ सादर त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त रक्कम संचालकांच्या संयुक्त खात्यात जमा केल्याची खात्री केल्याशिवाय विद्यार्थ्यांचे एनरॉलमेंट करु नये.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीसाठी.